# दोन औरंगाबादकरांनी साकारली पर्यावरण सोशल नेटवर्किंग साइट

**औरंगाबाद** | पर्यावरण क्रांती जगभर पोहोचविण्याकरिता इको नीड्स फाउंडेशनच्या वतीने इको फेस या सामाजिक वेबसाइटची निर्मिती करण्यात आहे. मंगळवारी या वेबसाइटचा उद्घाटन सोहळा श्रीलंकेचे खासदार अतुरलिप रतना थेरा यांच्या हस्ते भानुदास सभागृहात झाला.

या वेबसाइटला औरंगाबाद मनपा, बायडायव्हर्सिटी, प्रदूषण, इको रिव्होल्यूशन, पर्यावरण संशोधन, राज्य सरकारचे प्रदूषण मंत्रालय व केंद्र सरकारचे प्रदूषण मंत्रालय यात सहभागी झाले आहेत. या वेबसाइटवर शहरातल्या एखाद्या पर्यावरणासंबंधी समस्या टाकली, तर त्या समस्येवर तोडगा काढण्याकरिता मनपा कटिबद्ध राहील तसेच जगभरातील पर्यावरणाशी संबंधित संस्था, संशोधक, महाविद्यालय यावर सदस्य झाले आहेत, अशी माहिती वेबसाइट बनविणाऱ्या इको नीड्स फाउंडेशनच्या शिवाजी खंडागळे व प्रा. प्रियानंद आगळे यांनी दिली. लॉग ऑन करा www.ecoface.in.

## पहिलाच प्रयोग

फेसबुक, ट्विटर यासारख्या सोशल नेटवर्किंग साइट बनवताना कोणताही सामाजिक दृष्टिकोन नव्हता. मात्र इको फेस बनविताना इको रिव्होल्यूशनचे उद्दिष्ट समोर ठेवूनच याची निर्मिती केली आहे. हा जागतिक दर्जाचा पहिला प्रयोग आहे. या इको फेसच्या माध्यमातून कुणीही प्रदूषणाचे फोटो, व्हिडिओ, वेबलिंक, डॉक्युमेंट्स, ॲक्टिव्हिटी बटनच्या साह्याने पोस्ट करू शकता. यावर तुम्ही चॅटिंगही करू शकता, पण यावर पर्यावरणासंबंधित चर्चा व्हायला हवी, अशी अट आहे.'' **शिवाजी खंडागळे,** इको नीड्स

## पर्यावरणविषयक संपूर्ण माहिती

जगभरात पर्यावरण संदर्भात सुरू असणाऱ्या घडामोडी, तसेच पर्यावरणासंदर्भातील कायदे, पर्यावरण जनजागृती या वेबसाइटच्या माध्यमातून केली जाणार आहे. पर्यावरणासंदर्भात केलेला कोणताही कार्यक्रम यावर टाकल्यास त्याला जगभरातून मान्यता मिळण्याची शक्यता आहे. तसेच शहरातील जलस्रोत अभियान, सलीम अली, सुखना नदीसारखे अनेक विषयांची माहिती व ताज्या घडामोडीही या वेबसाइटवर टाकता येणार आहे. यामुळे एक फायदा असा होणार आहे की, संपूर्ण जगाचे लक्ष औरंगाबादच्या पर्यावरणावर राहणार आहे. तसेच मोठ्या प्रमाणावर यात तरुणांचा सहभाग असणार आहे.'' **प्रियानंद आगळे,** वेबसाइट डिझायनर

**सदस्य होण्यासाठी**

साइटवर नाव, ई-मेल, आयडी, पासवर्ड टाका व ई-मेलवरील लिंकला क्लिक करा व पर्यावरण क्रांतीमध्ये सहभागी व्हा.